# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ९७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. इराप्पा रामा कुंभार ,<br>रा. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. इराप्पा रामा कुंभार , रा. कोत्येंन बोबलाद, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेती गट क्र. ६४८ मध्ये ३ एचपी शेतीपंपास विद्युत पुरवठा मिळण्यासाठी दि. २०.७.२००९ रोजी पावती क्र. ५३२०७२० नुसार रु. ३३+१५००/– एवढी रक्कम भरली आहे. यानंतर वि.प.ने त्यांस दि. २२.९.२००९ रोजी चलन क्र. १९५५६ दिले आहे त्यामध्ये एन.सी. रु. २५००/– व एस.डी. रु. १५००/– चे दुसरे चलन दिले आहे.

सदरचे चलन पावती क्र. ५३२३९७६ दि. १२.१०.२००९ रोजी भरले आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने रितसर तक्रार दाखल करुन घेवूनही आदेश दिला नाही, म्हणून प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १६.४.२०१० रोजी दाखल केली आहे. तक्रारीतील विनंतीच्या कलमातील क्र. ४ नुसार विद्युत पुरवठ्यासाठी जादा भरलेली रक्कम व्याजासह परत मिळावी ही प्रमुख मागणी आहे. इतर मागण्यामध्ये चलनात एनसी हा कोणता अकौंट हेड आहे, हे माहिती व्हावे व हा आकार मा. आयोगाच्या मंजुरी प्रमाणे आहे काय ? चलनावर सही करणारे व तारीख वाढवून देणारे अधिकारी कोण आहेत व त्यांना असे अधिकार कंपनीने दिले आहेत काय ? एकदा चलन भरलेले असतांना परत चलन का भरुन घेतले हे अवगत व्हावे अशी माहिती विचारली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १४.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा अर्ज व त्याने भरलेले चलन रु. ३३ + रु. १५००/- दि. २०.७.२००९ रोजी भरल्याचे मान्य केले आहे. तक्रारदारास शाखा अभियंता, तिकोंडी यांनी दि. १५.६.२००९ रोजी सर्व्हीस कनेक्शनचे सहाय्यक अभियंता संख यांचे क्र. ५९ चे चलन मंजुरीचे पत्र दिले होते, त्यानुसार रक्कम भरली आहे. सदरचे ३ एचपीचे कनेक्शन थ्री फेज असून त्यासाठी ०.२४ कि.मी. वायर लागत असल्याचे दि. २२.९.२००९ च्या मंजूर फर्म कोटेशनवरुन दिसून येते. त्यामध्ये सर्व्हीस कनेक्शन चार्जेस रु. २५००/- व सेक्युरेटी डिपॉझीट रु. १५००/- दाखविण्यात आली होती, परंतु ग्राहकाला मुदतवाढ दिली त्यामध्ये दोनदा मंजुरी आल्याने सर्व्हीस कनेक्शन म्हणून भरलेली एस.डी.ची रक्कम रु. १५००/- कमी करुन चलन दिले आहे. त्यामुळे खाडाखोड करावी लागली. श्री. गजानन मारुती पाटील यांनी दि. १२.११.२००९ ला तारीख वाढवून दिली आहे. ग्राहकाची चलन भरण्यास गैरसोय टाळण्यासाठी असे केले आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १८.५.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार व त्याचे प्रतिनिधी गैरहजर. वि.प.तर्फे श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. अे.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. ३ पोल एल.टी. लाईनसाठी अंदाजपत्रक मंजूर झाले आहे. यापूर्वी सर्व्हीस कनेक्शन समजून अंदाजपत्रक करण्यात आले होते. तक्रारदार ग्राहकास रु. ३३/- परत करण्यास वि.प.ची हरकत नाही असे वि.प.तर्फे प्रतिपादन करण्यात आले.

श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता यांनी दि. १८.५.२०१० ला मंचासमोर आपले म्हणणे दाखल केले. त्यामध्ये रु. ३३/- ग्राहकास परत करण्यास हरकत नाही, चाचणी अहवाल दि. ३०.११.२००९ रोजी दिला व दि. १०.१२.२००९ रोजी जागेची तपासणी केली असता जागेवर संच मांडणी केलेली दिसून आली नाही. संच मांडणी केलेनंतर व कागदपत्रांची पूर्तता केलेनंतर त्यांना वीज जोडणी देण्यात येईल.

तक्रारीतील मजकुराचा अभ्यास केला असता, तक्रारदाराच्या वीज जोडणी मिळावी व जादा भरलेली रक्कम व्याजासह परत मिळावी या प्रमुख मागण्या आहेत. वि.प.तर्फे रु. ३३/- च्या वसुलीबद्दल कुठल्याही प्रकारचा खुलासा नाही उलट मंचासमोर रु. ३३/- परत करण्यास हरकत नसल्याचे लेखी / तोंडी प्रतिपादन केले. तक्रारदाराने व्याज मागितले आहे. व्याज मिळण्याचा तक्रारदाराचा हक्क आहे कारण कुठलाही अधिकार नसतांना तक्रारदार यांस दि. २०.७.२००९ रोजी रु. ३३/- भरण्यास वि.प.ने भाग पाडले आहे. तक्रारदाराने दि.३०.११.२००९ ला चाचणी अहवाल दिला आहे, परंतु दि. १०.१२.२००९ रोजी वि.प.ने जागेची पहाणी करतांना जागेवर संच मांडणी केल्याचे दिसून आले नाही. संच मांडणी केलेनंतर व कागदपत्रांची पूर्तता केलेनंतर त्यांना वीज जोडणी देण्यात येईल असे वि.प.ने लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यामुळे तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने तक्रारदारास रु. ३३/– अधिक सदर रकमेवर दि. २०.७.२००९ पासून १२% व्याज रोखीने द्यावे.

३) तक्रारदार यांनी संच मांडणी व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्यांना प्राधान्यक्रमानुसार वीज जोडणी देण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

5) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :